

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2734
REFBK-0023330
REFBK-0023330

# ॥ आलम ॥ अशोक बागवे ॥

काव्य
2834
23330
7991C

# आ
# आ ल म
# म

अशोक बागवे

REFBK-0023330
REFBK-0023330

मौज प्रकाशन गृह

आ
आ ल म
म

मौज प्रकाशन : २८८

पहिली आवृत्ती : मार्च १९८१

© १९८१, अशोक बागवे

मुखपृष्ठ : अरुण काल्वणकर

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
गिरगाव
मुंबई ४०० ००४

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत साडेआठ रुपये

या ग्रंथाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने अनुदान दिले आहे.

आ
आ ळ म
म

प्रिय दादास

लहानपणी तू माझी
~~जी चिरमुटे पुतळीस~~
त्यांतले एक
तुलाच अर्पण

आ
आ ल म
म

आ
आ ल म
म

अनुक्रम

१. नुस्ताच पांगलेला सूर्य
२. समुद्र मागे टाकून
३. गर्दीच्या समुद्रातून
४. धूसर अभ्रकाची संध्याकाळ
५. हळुवार फुलांच्या रेषा
६. ओहोटी
७. तुझ्या फेसाळ दर्याची
८. विझणाऱ्या देठात फुलाच्या
९. की समजा
१०. तू रिमझिमून संपू नकोस
११. हॉस्पिटल
१२. स्वतःच्या थरकत्या सावलीत
१३. उदासीन संधिप्रकाशात
१४. मैना
१५. तिची पिसं घेऊन
१६. गाडीच्या संथावणाऱ्या लयीत
१७. काळोख्या रात्री किल्ले रायगडावर
१८. हळूहळू काळोख वाढत गेला
१९. मोगरी

२०. गर्दी हरवलेल्या प्लॅटफॉर्मवर
२१. आधी प्रिया
२३. एक सकाळ संध्याकाळ तूच
२४. उगाचच झाडावरचे कावळे
२५. बराच शिणल्यावर
२६. मेफ्लॉवर
२७. रांगेने उभी झाडे
२८. बाग
२९. अरण्यफास
३०. कमळे
३१. झरा
३२. भकासपण छळत राहतं
३३. अबोल समुद्रातून
३४. गरगरता वाटोळा चंद्र
३५. गुलाब
३६. झाडे आतल्याआत फडफडत
३७. आपणहून सांगता आला नाही
३८. उशिरा रात्री एकट्यानेच
३९. वाळू अथांग पसरू लागलीय
४०. एकाकी पायऱ्यांवर
४१. अजाण तरी कसे राहू
४२. कंटाळ्याची कविता
४३. माणसं दचकणारी
४४. फुलाहून दिला आनंद
४५. आपल्यातलं ओलेपण
४६. आपण निवांत
४७. कदाचित
४८. नगरी
४९. हत्या
५०. मी गच्च बसून आहे खुर्चीत

५१. स्वतःचे असे काही
५२. एखादा तारा असो आकाशात
५३. जखमी चंद्र
५४. थेंबभर चैतन्यानं
५५. सर्वत्र भीतीची
५६. आरशासमोर
५७. दिवसांच्या धारदार करवतीने
५८. तिच्या चेहऱ्याच्या आठवणी
६०. क्वचितच आपण
६१. चतकोर
६२. कट
६३. व्यवस्थापन
६४. दंश
६५. दूरवरून ऐकू येणारं कुत्र्याचं भुंकणं
६६. आत्मरत घड्याळ
६७. स्वतःत स्वतःला कोंडताना
६८. विहीर
६९. पंप लावून
७०. एक प्रचंड पेटती सिगारेट
७१. जाळं
७२. छडीही गळून पडते
७३. बाहुली
७४. सूर्य आभाळाच्या चामडीवर तीक्ष्ण
७५. आपण दुसऱ्याला दिलासा देतो तेव्हा
७६. चारचौघांत क्वचित
७७. अज्ञात अक्षरांच्या खाडाखोडीत
७८. झाड
७९. योद्धे
८०. दैन्य
८१. लबलचक पुलावरून जाताना

आ

आ ल म

म

## नुस्ताच पांगलेला सूर्य

दिठीमिठीतून विझलेले श्वास वाऱ्याचे.
कपाळावर करपलेले घामांचे समुद्र.
जागोजाग पाण्याच्या भाजलेल्या जिभा.
मृगजळाचे फसवे डोळे.
मातीच्या फाटलेल्या ओठावर
पांघरलेले उन्हाचे निखारे.
नुस्ताच पांगलेला सूर्य
आभाळभर.

## समुद्र मागे टाकून

समुद्र मागे टाकून तुझी पावलं
वाळू कवटाळीत चालत गेली या किनाऱ्यावरून.
माझ्या डोळ्यांत उधाणलेला समुद्र.
मी तुला संध्याकाळ गाऊन दाखवली.
रंगांचे शहारे अंगभर
झाडे सळसळताना आत आत.
तुझ्या निःशब्द ओठांची तहान या संध्याकाळी :
मी थरारून जातो.
नुक्तीच समुद्र मागे टाकून तुझी पावलं :
मी तहानलोय तुझ्या समुद्रातून.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७३५
दा. क्र. 23330
काव्य
स्थानिक शाखा (स्थळ प्रत)

## गर्दीच्या समुद्रातून

गर्दीच्या समुद्रातून मी माझा किनारा शोधतोय :
कितीतरी ही पावलं पुढंमागं एकमेकात मिसळत रस्त्याच्या छातीवरून;
भन्नाट क्षणांतून प्रसवलेल्या असंख्य दबलेल्या किंकाळ्यांतून
सर्वसभोर आक्रंदणाऱ्या काळोखातून उभारून येतंय माझ्याभोवती
एक गुंतागुतीचं प्रचंड कल्लोळ गाणं;
स्वतःचं घरटं मागं टाकून मी वाहत चाललोय
या गर्दीच्या लाटांमधून : माझी पावलं थांबू पाहातायत.
मी अस्पष्ट तुला हाक देतोय.
नेमकी या वेळी तू कुठं असशील ?
की तूही गर्दीतच दबलेल्या श्वासात असशील झिजत
धो धो काळोखातून काळवंडलेली ?

## धूसर अभ्रकाची संध्याकाळ

धूसर अभ्रकाची संध्याकाळ डोळ्यांत कोरून
कोण सावल्यांना आमंत्रण देतो झाडांमधल्या ?
एकांताच्या थिजलेल्या वर्तुळातून
पक्षी कासावीस होताना
पंखांतून श्वास गळून जातात.
संथ सरकतात क्षण, ओघळतात;
सतेज प्रदेशाच्या सीमेवर
गर्भ शपथ घालतात फुलांना
उमलण्याची आतल्याआत;
दर्वळत्या लाटांना किनारे जवळ इतके
की टपटपतात थेंब पापण्यांमधून.

## हळुवार फुलांच्या रेषा

हळुवार फुलांच्या रेषा
कुणी हिरावून घेतल्या शिशिरातून त्यांच्याही नकळत ?
उदास बागेने प्रश्न केला प्रत्येक झाडाला
तेव्हा झाडांनी मौन पाळले
मिटून आपल्या पानांतून.

आता हा शिशिर संपल्यावर
पानांच्या हिरव्याचार रेषेतून
फुलांची इवली इवली काळिजं हलत राहतील,
तेव्हा सबंध बाग निरुत्तर होईल
प्रत्येक झाडाच्या मोहरल्या प्रश्नांनी.

## ओहोटी

ओहोटीच्या समुद्रकिनाऱ्यावर मी उभा आहे एकटा.
संध्याकाळ समुद्रात नुकतीच संपलीय.
सर्व आवाज माझ्यापासून दूर गेलेयत
जसा तुझ्यापासून दूर इथे मी उभा
माझ्यापासून दूर जाणाऱ्या पाण्याकडे पाहत.
नकळत मनात एक गाणं रुजून येतंय.
निदान तू तरी येऊ नकोस ओळींमधून
या एकट्या ओहोटीच्या वेळी.

## तुझ्या फेसाळ दर्याची

वाहती धूम्रवलये तुझ्या फेसाळ दर्याची.

वाळूच्या खोल खोल श्वासात
रुतलेला तुझा दगडी किनारा;
पाण्यातून खोवलेल्या शिडाशिडात
धुंदावलेला गवती वारा.

गिरवलेली चार अक्षरे
पांढुरक्या पंख निळ्यात;
लोचटपणा माझ्या मनाचा
उस्कटलेला माशाच्या खवल्यागत.

वाहती धूम्रवलये तुझ्या फेसाळ दर्याची.

## विझणाऱ्या देठात फुलाच्या

विझणाऱ्या देठात फुलांच्या
तिचे म्लान स्मित
कोरून ठेवले.
मी जगलो पाकळ्या विस्मरून
पुढचे सर्व दिवस
जागत्या पहाऱ्यात तिच्या म्लान स्मिताच्या.
आता मला स्पष्ट आठवतात
स्मितानंतरची जागणारी फुले
एकांतात टपटपणारी.

## की समजा

की समजा मी मेलोय,
की समजा मी जिवंत आहे,
की समजा मी कुणीच नाही,
तर काय फरक पडतोय विश्वात?
विश्व चक्राकार शाश्वत म्हणूनच
मर्त्य मी एक.
एका फांदीवर कावळा, बगळा, हत्ती, गांडूळ, माशी
तसाच मी एक बसलो
तर कोणत्या दिशेने मोडावं फांदीने?
उत्तर काही नाही.
की समजा उत्तर मेलेय,
की समजा उत्तर जिवंत आहे;
उत्तर निरुत्तर आहे.

## तू रिमझिमून संपू नकोस

आपल्या सर्व सांडणाऱ्या वेळा
तू जमवू नकोस,
आणि अधाशासारखी टिपू नकोस
एक एक रंग.
अजून पडायचा आहे पाऊस;
त्याअगोदरचा थंड उजेड
पालवू नकोस डोळ्यांमधून.

हे आयुष्य निराधार आहे :
निराधार आपल्या पावलांना संगत
फक्त कोसळणाऱ्या पावसाची.
तू रिमझिमून संपू नकोस
त्याआधीच.

## हॉस्पिटल

हॉस्पिटलच्या दरवाजासमोरचं हे झाड
दिवसेदिवस
अधिकच काळपटत जाणारं
पावसात दाटून येणाऱ्या संध्याकाळीसारखं;
आणि त्यापुढचा अबोल रस्ता
पेशंटच्या चादरीसारखा
आपल्यातच गुंतलेला निर्विकार.

मी आता हाक देणार आहे कुजबुजती
वॉर्डमधल्या वडिलांना.
हाकेसरशी थरकेल हलकी
त्यांच्या डोळ्यांवरील पट्टी.
औषधासारखा घोटाळणार आहे त्यापलीकडचा क्षण.
थोडासाच डहुळेल डोळ्यांसमोरचा काळोख.
माझ्या चेहराभर फिरणारे थरकते हात थांबवून
मी घेणार आहे न बोलता निरोप
पुन्हा येण्यासाठी.

परतताना झाडांच्या थरकत्या सावलीत
जाणवते मागल्या दिवसांची प्रचंड घालमेल;
त्यापूर्वीचं पिसासारखं वाहणं
आणि क्षण टाळून बोलणं.

मला पूर्ण माहीत आहे :
बाबांच्या अधू डोळ्यांना दिसणार नाही
हे काळपटत जाणारं झाड
आणि त्यावरचे उडून गेलेले रंग.

## स्वतःच्या थरकत्या सावलीत

मी अक्षरांत बुडत असताना
ते दोघे मला सोडून निघून गेले.
हे जाणवल्यानंतर
शांतपणे स्वतःला
शब्दांपासून सोडवून घेतले.
हलकेच पुस्तक मिटले.
हातांची घडी छातीवर मुडपून
अधोमुख रस्त्यातून चालू लागलो.
स्वतःच्या थरकत्या सावलीत
स्वतःला न्याहाळू लागलो.

## उदासीन संधिप्रकाशात

या उदासीन संधिप्रकाशात
अधिकच उदासीन वाटणाऱ्या बागेत
मलूल तू एकटीच बसताना
एकेकस्या फुलात तुझा चेहरा विझत जातो
संधिप्रकाशासारखा ओसरत.

मी निःशब्द तुझ्या हालचाली न्याहाळतो
किनाऱ्यावर राहून
दूर जाणाऱ्या पडावाचा ठिपका
विरघळत जाताना पाहावा तसा.

मलाही कळत नसतात दिशा
तुझ्या हृदयातल्या काळोखणाऱ्या
आणि तुझ्या चेहऱ्यावर
फुलेच फुले रुतत जातात क्षणाक्षणाला.

## मैना

झाड असतं.
फांद्या असतात.
फांद्या निमुळत्या झाल्या की
डहाळी असते.
डहाळीला लगडून पानं.
क्वचित फुलं.
इवलीशी छाती भरून फुलं हुंगणारी
मोडल्या पंखाची मैना
डहाळीवर बसलेली.

सोसाट्याचा वारा येतो.
प्रथम फुलं आक्रसतात.
पानं आक्रसतात.
मग क्रमाने डहाळी, फांद्या, झाड वठतं.
मोडल्या पंखाची दुखरी मैना
पंख अवकाशावर तोलून धरीत
भुर्रकन उडून जाते.

## तिची पिसं घेऊन

तिची पिसं घेऊन मी माझं घरटं बांधलं
आणि निवांत पहुडलो चाहूलहीन एकांतात.

आता गोरीभुरी झालीत
तिच्या-माझ्या एकांताची हिरवी पानं
या पतझडीच्या ऋतूत.
हे हिवाळी दिवस आहेत
तिच्या-माझ्यात पसरलेले.

मला ओळखायला हवाय
निवांततेचा नाद
ऋतू उलटण्याआधीचा
आणि शोधायला हवाय निवारा
एका उबदार पंखाचा.

घरटं जाळून
येता उन्हाळा मला साजरा करायचा आहे.

## गाडीच्या संथावणाऱ्या लयीत

सतत बदलणाऱ्या प्रकाशाच्या
वळसेदार पट्ट्या.
गाडीची धावती धडधड.

काळोख भरलेल्या डब्यात
समोरच्या माणसाचा धूसर उजळलेला चेहरा
उलगडणारा विझणारा.
त्याच्या डोळ्यांना जाणवणारा मीही
त्या बाजूने तसाच कदाचित.
दोघेही परस्परांना अनोळखी
ठिबठिब काळोखात निरखणारे एकमेकांना.

गाडीच्या संथावणाऱ्या लयीत,
आता दोघांच्याही हृदयात
ओळख विसरल्यानंतरचा शून्य थकवा :
शेवटचं स्टेशन आल्यावर माणसं भराभर उतरून
डबा रिता व्हावा तसा.

## काळोख्या रात्री किल्ले रायगडावर

पावलांच्या आवाजाशिवाय
आणि पानसळसळीशिवाय कुठलाच
ध्वनी नाही आसमंतात.
मी थेट चालत गेलो पुढे पुढे
काळोखाचा प्रचंड पहाड भेदीत.
सभोवार कापऱ्या थंडीत डोंगरांचे अंधारस्नानी सुळके.
पायांखाली गवताचे सुकलेले तुरे.
त्याच्या ओल्या कापऱ्या वासात
श्वासासोबत मंद चालताना
समोरून दोन टक्क डोळे लकन पेटले :
भयाण अंधारात पहाडावर एकाएकी
दोन काजवे चमकून विझावेत तसे.

## हळूहळू काळोख वाढत गेला

हळूहळू काळोख वाढत गेला झाडांमधून;
वेढत गेला फांद्या, पानं, फुलं.
संध्याकाळचं सतेज हिरवं झाड
अधिकच गेलं काळपटत.
फडफडणारी पानं उन्हामधली आता
झाली निश्चल स्तब्ध
बरंचसं भोगलेल्या माणसाच्या समंजस चेहऱ्यासारखी.
स्तब्धतेचा एक प्रवाह गेला सरसरत
झाडांवरून...माझ्यावरून...माझ्यातल्या असहायतेवरून...
भोवती
वाढत जाणाऱ्या काळोखात
वेढत जाणारी
अपुऱ्या एकटेपणातली हुरहूर :
खोल तळातून बुडबुडा पसरत पसरत मोठा होत
पृष्ठभागावर येऊन फुटावा तशी.

## मोगरी

एक टपोरा मोगरीचा कळा
तळहातावर चुरगळून तिने
आपला तळवा खोलवर हुंगून घेतला
आणि खांद्यावरील राघूला
हवेत अलगद सोडून दिले.

दिवस झुलत झुलत निघून गेला...

रात्री खूप उशिरा जेव्हा ती
अचानक झोपेतून जागी झाली
तेव्हा तिच्या डोळ्यांच्या गूढ प्रदेशातून
तिला तिचा राघू
पंख फैलावून परतताना दिसला.
तिच्या हृदयातून मोगरीचा टपोरा कळा
हळूहळू घमघमू लागला
कळ्या कळ्या जोडलेला पूर्ववत.

## गर्दी हरवलेल्या प्लॅटफॉर्मवर

संपूर्ण प्लॅटफॉर्मवर एकही प्रवासी नाही.
गाडी आली तीही
एकही माणूस नसलेली
रिकामीच.

एक प्रचंड लांबीचा आयताकृती
धडधडणारा ठोकळा येऊन स्थिरावला
गर्दी हरवलेल्या प्लॅटफॉर्मवर.
फक्त पावलांचे आवाज
आत-बाहेर वाजणारे
आणि हळूहळू दबत चाललेला कोलाहल.

संपूर्ण रित्या प्लॅटफॉर्मवर
सिग्नलचा लाल जिलेटीन गुंडाळलेला.

## आधी प्रिया

मित्रा,
हा खाजगीपणाचा मोसम :
प्रथम प्रिया यावी
आणि नंतर पाऊस.
प्रिया आली की ती पाऊस घेऊन येणारच आपणहून.

प्रिया आली की
सर्व मित्रांना सस्नेह निरोप आपण दिलेले
आणि त्यांनी स्वतःहून घेतलेले.

मित्रा,
प्रियेत आपण गुंतून पडलो की
आत्यंतिक खाजगी होत जातो.
डोकावत जातो स्वतःत तरी
संपूर्ण संदर्भांनिशी उरतो पुन्हा प्रियेचेच.

दिवसभर जोपर्यंत बागेवर आकाश झुलत असते
तोपर्यंत बाग आकाशाची असते.
आकाशाची सावली परती झाली की
बाग स्वतःत बुडते,
एकट्याशीच खाजगी होत जाते.

एकदा तू बागेत बसला होतास एका अनोळखी झाडाखाली
प्रियेची आराधना करीत;
इतर मुली तुझी चौकशी करून गेल्या
पण त्यात ती नव्हती;
तेव्हा तुझ्या डोळ्यांतला पाऊस
प्रियेच्या अगोदर आला होता.

पावसाने चुकूनही प्रियेच्या अगोदर येऊ नये.
आधी प्रिया,
नंतर पाऊस.

## एक सकाळ संध्याकाळ तूच

एक सकाळ संध्याकाळ
निनादत राहतेस तू
सागराच्या हलक्या गाजेसारखी
माझ्या आतून बाहेरून.

मी असा दिवस-रात्र
स्वतःत गुंफून घेतो तुला
ते तुझ्यावरील
प्राणांतिक प्रेमामुळे नव्हे.

मला माझाच भरवसा नसतो :
कुठल्याही क्षणी
मी मला पारखा होईन.

## उगाचच झाडावरचे कावळे

हे एकाएकी समोरच्या झाडांवरील कावळ्यांना ओरडावयास झाले तरी काय ?
या झळाळ उन्हातून झाडाचं एकही पान हलत नसताना
भकासपण डोळ्यांत रुतत जाते सर्व संवेदना बधिर करीत,
सर्वांतून सुटा होऊन तरंगत राहतो मेंदू आतल्याआत.
आजूबाजूला भयंकर अमानुष कोसळणारं असं
काहीसुद्धा घडत नसताना उगाचच थकवा येतो.
आतल्या आत दबलेलं क्रंदन कोसळत ढासळत
उसळी मारूनही येत नाही.
डोळे उगाचच ओलावतात.
खरं म्हणजे उगाचच हे मघापासून
झाडावरचे कावळे ओरडतात.

## बराच शिणल्यावर

बराच शिणल्यावर
सैल अंग टाकतो स्वतःच्या खांद्यावर.
डोकावतो माझ्याच आत
त्रयस्थपणे हळूच.

हृदयाची धडधड चालू असते संथ.
डोळ्यांची निर्लेप उघडझाप.
आणि ओठावर एकही शब्द नसतो
तुझ्यासाठी,
आपलेपणाचा किंवा
दुखवण्यापुरताही.

## मेफ्लॉवर

अगदी आत आत अलगद भरून येऊन
प्रेयसीने उत्सुक होऊन पसरावेत
आपले हात
तसं हे झाड :
सर्वांगानं ओथंबलेलं.
आपल्या पिवळयाचुटूक पानांनी खळाळून हसणारं.
स्वच्छ निळ्याभोर आकाशासारखं प्रसन्न.
माझ्या नसानसांच्या व्हायोलिनवर
आपल्या उग्रमधुर वासाचं संगीत
सकाळ-संध्याकाळ छेडणारं.
रोजच जागेपणी स्वप्नाभासात
टपटपणाऱ्या कवितेसारखं
सात्त्विक.

## रांगेने उभी झाडे

रांगेने उभी अंतराअंतरावर निरनिराळी झाडे.
उन्हाचे कोड फुटल्यागत वाहता रस्ता.
त्यावर चटईच्या धाग्यांसारखी परस्परांना
छेद देणारी वळवळणारी माणसे.

झाडे निश्चल, अविकारी.
माणसे वेगवेगळ्या विश्वांत एकाकी रमणारी.

रस्त्याखालून आपल्या असंख्य मुळांच्या आतड्यांनी
एकमेकांत जखडलेली झाडे;
वरती सळसळणाऱ्या हजारो पानांनी
परस्परांना भिडलेली पुन्हा.

## बाग

चिवचिवणारी मुले : किलबिलणारी फुले
झोपाळ्यावर, घसरगुंडीवर, सी-सॉच्या फळीवर.
नाजुक इवल्या पायांची भिंगरगिरकी हिरवळीवर.
सभोवार बागडणारे देहधारी चैतन्य.
लहानमोर डोळ्यांतून बरसणारा हसरा प्रकाश.
जणू संपूर्ण बाग एक रसरशीत डाळिंब
आणि भोवताली कुजबुजणारे तांबुसलाल दाणे इवले इवले.

इवल्या पावलांचे मातीमधले परतलेले ठसे
दिव्याच्या प्रकाशात थिजलेले.
थिजलेले झोपाळे, मरगळलेली घसरगुंडी.
झाडांच्या शापित मौनातून
ताल विसरून हलणारी सी-सॉची फळी फक्त.
संपूर्ण बाग—
माणसं सोडून निघून गेलेल्या पोरक्या गावासारखी.

## अरण्यफास

घनघोर अरण्य आणि झाडांचे बुंधेच बुंधे भवताली.
मी गोठून उभा मध्यभागी बुंध्यांसारखाच खिळून.
अरण्याचा फास सर्वांगाला वेढत येणारा चोहोबाजूने.
भवतालून झाडे चालत चालत जवळ येणारी
एकमेकांत मिसळून एक प्रचंड जाळी होऊन.
वाटले मीच होईन झाड किंवा होईन एकाएकी
गडप झाडाखालीच, इतकी भयंकर झाडे :
क्रूर श्वापदासारखी अंगावर चालून येणारी.
काळवाघाच्या डोळ्याला डोळा भिडविलेल्या
अगतिक बकरीसारखा मी : बांधलेला मातीशी,
झाडांचे खाद्य बनून भेदरलेल्या नजरेने
पाहत झाडांची आक्रमक चाल माझ्या दिशेने.

## कमळे

तिने थरथरत माझ्या हातात
कमळे ठेवली.
म्हणाली, ‘ जप यांना उन्हापासून
धग लागून देऊ नकोस—’
असं म्हणून निघून गेली.

तेव्हापासून सावलीचं वरटं बांधून
केव्हाचा बसलोय मी ही कमळं सांभाळीत.
बाहेरच्या सूर्योदय-सूर्यास्ताचं भान नाही.
ती येईल की नाही पुन्हा
माहीत नाही.

कंटाळून मी आता कमळं विकायला काढलीत.
घेणारानं फक्त एक करावं—
तिला उन्हाची खात्री द्यावी,
वा सावलीचा भरवसा.

## झरा

'निळासावळा झरा वाहतो'
तुझ्यातून, माझ्यातून, आपल्यातून
त्या पलीकडच्या झाडातूनसुद्धा
म्हणूनच तर तरारतात क्षितिजे
आणि तुमच्या-आमच्या स्वप्नांवरून
शेवटचा रंधा मारण्यापूर्वी
जोखलेल्या सर्वच दिशा उत्सुक असतात
झऱ्याचा नाद ऐकण्यासाठी.
तर हेच की
प्रत्येकातील निळा झरा सावळा होईपर्यंत
हे असं
बेटाबेटातून भन्नाट वाहायचं
चार घरांचं स्वतःचं चिमुकलं गावही
महापुरात बुडून जाताना पाहायचं.

## भकासपण छळत राहतं

जेव्हा काही म्हणजे काहीच नसतं सुचत मनात
रितं रितं वाटतं समोरचं भरलेलं अवकाश;
आणि आपण असतो
एका चिरंतन पोकळीत भिरभिरणाऱ्या
असहाय पाकोळींसारखे
शोधीत आधार पंख टेकवण्यापुरता तरी.
वंचित झालेले सगळे दिवस
शुष्कसे वाहत असतात उदास थकलेले
जसे वाहतात वांझ ढग कोरड्या आभाळातून.
भटकत्या पावलांना रस्ता संपलेला जाणवतो.
आणि स्वतःच्याही पलीकडे निःस्तब्ध समुद्रातून
पार करणारे आपले हात
अपार थकतात.
भकासपण छळत राहतं...छळतच राहतं
ओंडक्यातून आरपार फिरणाऱ्या करवतीसारखं.

## अबोल समुद्रातून

दीर्घकाळ निमूट बसून
आपल्यातला निःस्तब्ध समुद्र
पार करता येणार नाही
आणि नाही जागवता येणार किनारे
फडफडत्या समुद्रापक्ष्यांच्या शुभ्र ओळींमधून.
असे संथपणे लाटांसारखे ढळत राहिलो परस्परांवर
तरी पावलं उदास उमटत राहतील
संबंधांच्या वाळूमधून
आणि हरवल्या शब्दांचे पडाव
हेलकावतच राहतील आपल्यातल्या
अबोल समुद्रातून.

## गरगरता वाटोळा चंद्र

कोऱ्या कागदावर
रेघोट्या ओढून आडव्यातिडव्या
भिंगोरवाटोळया
एका अदृश्य चित्राला तो जातो सामोरा
आणि न्याहळत बसतो
एक अदृश्य आभाळ, त्या आभाळातला चंद्र
टपोर शुभ्र चांदणं पडलेलं त्यात—

पाहता पाहता रेषा सजग होतात
एक एक विलग होऊन
त्याच्या भोवती फेर धरतात
तो भोवंडून जातो रेषांच्या गच्च भोवऱ्यात
आणि होऊन जातो
गरगरता वाटोळा चंद्र लटकता
कोऱ्या आभाळात—

## गुलाब

१.

अखंड दरवळणारा गुलाब
जो मला अभिप्रेत आहे
तुझ्या निर्व्याज स्मितांमधला.
पाकळ्या पाकळ्या घेऊन त्याच्या
अधाशीपणे
शाकारीत बसतो मी
माझ्यातले निस्तेज फूल.

२.

तुझ्या नाजुक कळ्या
माझ्या राठ देठाला कधी डसल्या
कळलेच नाही.
सबंध देठादेठावर
फुलं बिलगून होती थरथरती
त्यानंतर.

३.

तुझ्या सुगंधाने
दर्वळतो हरएक प्रहर इथला
आणि श्वासामधले धिमे आश्वासन
मोहरून जाते अखेरच्या क्षणी
जेव्हा मी मोजत बसतो
माझ्यातल्या अविरत पाकळ्यांची झड
सोशिकपणे.

## झाडे आतल्याआत फडफडत

झाडे आतल्याआत फडफडत राहतात पानांमधून;
बावरलेल्या पक्ष्यांची बेसावध घरटी देठातून हलतात
आणि पंखांवरची थरथरती लव विस्कटून जाते :
त्या शहारत्या रांगोळ्या फुलांच्या काळजाला लुचतात.

किती प्रहर कोसळतात धवधवत पांगल्या श्वासांतून
कापऱ्या वातीसारखे थरथरते क्षण जवळ वाहत येताना;
मी सावरीत बसतो फांद्याफांद्यांतून अवघडलेली घरटी
हलत्या छायेमधून झाडांच्या संथपणे फुले मावळताना...

## आपणहून सांगता आला नाही

आपणहून सांगता आला नाही अर्थ पावसाचा तुझ्या डोळ्यांमधला;
कुठली भिजली जमीन त्याने, तेही सांगता येणार नाही;
फक्त ओल जाणवत राहिली त्यानंतर कितीतरी काळ
ते थबथबते प्रहर एक एक म्हणून मोजता येणार नाहीत.

आपणहून भोवरत गेलो, गेलो वाहत प्रवाहात :
किनारा भेटला कुठे आणि कुठे सुटला तेही सांगता येणार नाही;
असे जे तुझे माझे आत आत आणखी काही अवघडले होते
ते ते सगळे डोळ्यांमधून पावसासारखे तोलता येणार नाही.

## उशिरा रात्री एकट्यानेच

उशिरा रात्री एकट्याने
एकाकी आडवळणी स्टेशनावर उतरल्यानंतर
गार वारे झोंबू लागतात आणि आत हृदयात
हळूहळू हिम स्त्रवू लागतं.
तशातच पाठीमागं गाडी निघून जाताना
डोळ्यांत बारीक बारीक प्रकाशी ठिबक्यांची मेणबत्ती
जळत राहते फडफडती.

एखाद्या अनोळखी परदेशी माणसासारखा हा हिवाळा
समोरून चालत येतो माझ्याशी सलगी करीत;
मी निमूट चालतो ओळख न देता.
हातांची घडी अधिकच गच्च करतो
असहायतेने आपल्याच शरीराला मारलेल्या मिठीसारखी.
आणि अनुभवतो
दूर शहरातल्या मित्रांच्या गप्पांची ऊब
वारंवार त्यातून.

पुढे असतं
काळोखातल्या अंधुक दिव्यासारखं घर.
आणि त्याच्या आसऱ्याला परतलेला मिणमिणता मी.

## वाळू अथांग पसरू लागलीय

किनाऱ्यावरची वाळू
समुद्राच्या पाण्यावर अथांग पसरू लागलीय
आणि पाणी आतल्याआत गढूळतंय.
मी झाकतोय माझा चेहरा माझ्या धुळकट हातांनी
डोळ्यांतली तरारलेली शिडं मालवतायत समजूतदारपणे...

## एकाकी पायऱ्यांवर

एकाकी पायऱ्यांवर
भराभर सिगारेट ओढत
येणाऱ्या कुणाची तरी वाट पाहून थकलेल्या मनात
सिगारेटच्या पांढुरक्या राखेचे थर साचत जातात.

विझत चाललेल्या प्रतीक्षेत
निष्क्रियतेच्या उशीवर कलंडून
नुस्ताच निवांत बसलेला मी :
अडगळीत कोपऱ्यात ठेवलेल्या बोचक्यासारखा शिळावलेला.

माझी सावली माझ्यापासून विलग होऊन
तरातरा समोरच्या रस्त्यातून चालत जाते
आणि मी नुस्ता बघत राहतो,
हातातल्या सिगारेटची राख झटकत निमूट...

## अजाण तरी कसे राहू

अजाण तरी कसे म्हणू?
जाणतेस तू सर्व,
आकाश आणि माती यांतले भेद.
प्यासी ओठांचे अनादी रहस्य.
झुकलेल्या डहाळ्या आणि थरथरते गुलाब
बावरल्या नजाकती देहातून.
देहाहून गूढ पलिकडचे :
अज्ञात चमचमते पाणी डोहातले.

अजाण तरी कसे राहू
जाणल्यावर सर्व जगण्याच्या खुणा?

## कंटाळ्याची कविता

डोक्यावर डोके आपटणे
असा खेळ.
अगदी मेंदू बाहेर येईपर्यंत हे अस्संच.

मग हताश होऊन समोरासमोर बसणे
पाय फाकवून नुस्तेच नाकावर बोट ठेवून
डोळ्यांना ताणून ताणून मोठे करीत
असा आणखी एक खेळ.

समोर टेबलावर,
प्रत्येकाच्या बशीत चमचाचमचाभर कंटाळा आधीच वाढलेला
आणि पालथ्या हातांतून काटेचमचे आरपार रुतलेले.

मग शेवटी
पर्यायी खेळ म्हणून
स्वतःचे हृदय हातात घेऊन गच्च दाबणे.
म्हणजे हृदयातून असंख्य चिमण्या चिवचिवत चिवचिवत बाहेर पडतात.
मस्तकभर कंटाळ्याच्या तीक्ष्ण चोची नांगरून ठेवतात.

## माणसं दचकणारी

मी पाहतो माणसं
जथ्याजथ्यानं हिरवळीवर
अचानक विझावं कारंजं आतल्याआत
तशी मिटून बसलेली.

गच्च लपेटून डाचणाऱ्या समस्या स्वतःभोवती
की ओठांच्या थरथरीनेही उन्मळून पडेल
प्रश्नांच्या अंगावरची ढलपी
अशी सूक्ष्म भीती चेहऱ्यावर रापलेली.

माणसं बसलेली भर उन्हात
डोक्यावर सुरक्षित छत्री कल्पून.
त्यांनी सावरल्यात आपल्या थरथरत्या हातांनी
छत्रीच्या मोडक्या गंजलेल्या तारा
कुठल्याही क्षणी छत्री मिटेल म्हणून.

स्वतःभोवती वर्तुळ आखून
परिघावर पहारा देत बसलेली माणसं,
कुणी सूक्ष्म कीटक आत येऊ नये म्हणून
डोळ्यांनी अंदाज घेणारी सावध.

माणसं बसलेली नुस्ती
तिन्हीत्रिकाळ चारी प्रहर
भीतीचा सायरन घुमणारा आतून.
कुणी जातो चालत दाणदाण पावलं टाकीत समोरून
आणि शहारून आकसतात अधिकच गच्च बांधल्यासारखी.

## फुलाहून दिला आनंद

फुलाहून दिला आनंद प्रकाशित
जो तुला मला आपलासा करता आला नाही.
दिवसा जी नक्षत्रं छुपी असतात पानझाडीतून
त्यांचं देणंही फेडता आलं नाही.
आता क्लांत रात्रीतून
दोन्ही हातांची शिडं उभवून
आकाश कवेत घेण्याचा अट्टाहास
तूही सोडावास
आणि मीही.

## आपल्यातलं ओलेपण

झाडं आकार बदलतात
मातीतली ओल मिळवत.
मुळं घट्ट रोवून
कित्येक प्रहरांच्या साखळीतून
एकमेकांत मिसळत
निभावून नेतात स्वतःला.
हे एकदा
तुला समजावून सांगायचं होतं.
झाडांच झाडपण,
आपल्यातलं आपलंपण,
नेमकं कसं विसरायचं.
मुळांत मुळं गुंतून पहुडलेलो आपण,
सखोल झिरपणारं आपल्यातलं ओलेपण.

## आपण निवांत

आपण निवांत जगतो
शेवाळासारखं.

किती कोसळतात बुरूज
आणि बुरुजासारखी हृदये.
खडकातून झरे फुटतात आणि पुन्हा खडक
गोठून जातात.

हातावर फुलाफुलाला जपणं,
हात उंचावून वाहत्या ढगांना थोपविणं,
किंवा हातच आभाळाला दान करणं,
होत नाही.

आपण निवांतपणे जगतो
रक्ताऐवजी हृदयात पाणी साठवून.

## कदाचित

कदाचित माझ्या सर्वंच गोष्टींचं
हसू होईल.

मीच माझा तिरस्कार करीन.
अनंत योजनं चालून मीच दवंडी पिटवीन
की मी एक हरलेला योद्धा.

कदाचित अडखळेन ठेच लागून
तुझ्या फुलवारी श्वासात.
कोसळेन काळोखी आवेगात.

मला मीच सांभाळीन
सर्वांच्या नकळत,
कदाचित.

## नगरी

एक नगरी वसली आहे माझ्या आत.
वेडेवाकडे रस्ते, मख्ख सार्वजनिक बागा
आणि माणसांचे थवे सैरभैर.
सकाळ-संध्याकाळ त्या नगरीतून फिरतो एक शुभ्र घोडा.
वेशीवरून थेट स्मशानापर्यंत जातो;
थडग्यांपाशी खिंकाळत दौडत येतो पुन्हा वेशीपाशी.
रात्रीच्या काळयाभोर एकांतात
घोडा चौखूर मिटतो स्मशानातील एका काळोखी कोपऱ्यात.
फुरफूर विझवतो अलगद आयाळीतून;
आणि टक्क ऐकतो एक दबून फुटलेला हुंदका
नगरीच्या प्रत्येक घराघरातून...

## हत्या

त्यांनी अचानक उभा केलं मला
भर मध्यान्ही वाळूच्या पठारावर;
आणि चोहीकडून लखलखती हत्यारे
माझ्यावर रोखलेली.

प्रथम घशाला कोरड पडत गेली.
असंख्य तापलेले कण
चेहऱ्यावर फवारू लागले.

मग हळूहळू
श्वासातून भुळूभुळू माती गळू लागली.
बुब्बुळाचे जड जड खडे झाले.

त्यांच्या हत्यारांना जराही इजा न होता,
सावकाशपणे
मी मारला गेलो.

## मी गच्च बसून आहे खुर्चीत

मी गच्च बसून आहे खुर्चीत;
आणि खुर्ची
खोलीच्या भल्यामोठ्या चौकोनी खुर्चीत गच्च.

मी पाय लांब केले की
समोरच्या रस्त्यावर पसरतात;
आणि भल्यामोठ्या जांभईने
झाडावरची फुले आकसून जातात.

मी पाय आकसून घेतले की
घराचा चौकोन मोठा होतो;
आणि प्रत्येक कोपऱ्यात एक एक झाड
अलिप्तपणे थरथरत उभं असतं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2834
वा. क्र. 23330
काव्य
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## स्वतःचे असे काही

स्वतःचे असे काही
स्वतःपासून दूर ठेवताना
आतल्या सर्व झणाणत्या तारांची स्वरमंडळे
चुचकारून शांत करावी लागतात.

हा निवांततेचा आकांत
गुहेत झोपलेल्या सिंहासारखा सावध-असावधसा;
की सावज फिरते आहे हल्ल्याचा अंदाज घेत
आणि हल्ला होतच नाही.

## एखादा तारा असो आकाशात

एखादा तारा असो आकाशात
की खच्चून भरलेला चंद्र,
माझ्या जमिनीवर जे चांदणं पडतं
ते नासून गेलेल्या दुधासारखं असतं.

मी दगडातून आकार शोधू पाहतो
तेव्हा माझे छिन्नी-हातोडे माझ्यावर उलटतात,
शरीरावर घाव घालतात :
जिथं खळगा पडतो तिथं माझं हृदय असतं.

तळहातावरच्या रेषा पुसून मी
नीट मनाजोगत्या आखून घेतो
किंवा केळ्याच्या सुकलेल्या सालीवर
माझा इसवीसन कोरू पाहतो;
गेलेल्या दिवसांच्या काळ्या डगल्यावर
गुणाकारासारखी लाल खूण ओढून ठेवतो.

घुबडाचे डोळे आकाशभर गळतात
नि आकाश झाकोळून जाते :
त्या विक्राळ सावलीची चादर अंगभर ओढून
आता निद्रिस्त पडून असतो तोच मी.

## जखमी चंद्र

जखमी चंद्र हिंडत राहतो वैराण आकाशात
तसे घायाळ दिवस हिंडत राहतात आयुष्याच्या वाटेवरून.
आपण खचतो कुणासाठी तरी, अपरंपार थकतो.
पावलांतून निघते सावली, दिवसभर वर्तुळाकार फिरून
शेवटी येते पायांच्या खोप्यात, काकडलेल्या हिवाळी दिवसांसारखी.

उसासून फिरत राहिलो मी माणसांच्या जत्रेत.
आकाशपाळण्यांचे मेळ आणि विदूषकांचे खेळ
सारख्याच कौतुकाने पाहिले.
गजबजून गेलो कोलाहलात, तितक्याच शांतपणे परतलो स्वतःत.
अलिप्त होऊन पाहिले सर्वांतून माणसांचे उत्सव
आणि स्वतःवरच कोसळत राहिलो बेदरकार बेहोषीतून.
जपले डंखांतून चैतन्य आणि पंखांतले जोम समंजसपणे.
असे बरेचसे समज-गैरसमज स्वतःबद्दलचे गुंफून ठेवले :
दोऱ्यात ओवून ठेवावीत फुले रंगीबेरंगी तसे.

हिरव्यागार पानांच्या जाळीदार रेषा काढाव्यात नखलून
तसे सोलत राहतो आता प्रत्येक दिवसांचे हिरवे क्षण.
आणि जखमी चंद्र उसासत राहतो वैराण आकाशात.

## थेंबभर चैतन्यानं

वैयक्तिक रीत्या प्रत्येक झाड सळसळत असतं,
पानांच्या चिपळ्या वाजवीत बसतं.
माझे टाळ-मृदंग
कुठल्या भीमेच्या तीरावर विसरून आलो आहे मी ?

दिंडी जात आहे पुढे; गेलीही असेल;
जयघोष मागच्या मागे घुमत राहतो.
कान बधिर होईपर्यंत मी मलाच हाक देत सुटतो.
आता सापडलो आहे चिमटीत असं वाटतं; दुसऱ्या क्षणी
वाळूमध्ये गळाभर रुतून बसलेला दिसतो.

माझी मुळं तहानेच्या शोधात
अहोरात्र सरपटत आहेत;
भक्कम जमिनीची ओल ओस पडत चाललीय.
कधी कधी थेंबभर चैतन्यानं
सळसळतंही आतलं झाड;
पण मुक्या मुलाच्या हातवाऱ्यांसारखं.

## सर्वत्र भीतीची

उन्हे काळी पडत चालली आहेत
आणि दिवस गोरेमोरे.

कुणाची नस उडावी थाड थाड
पुसटशा स्पर्शाने
तसा रस्त्यांचा थरकाप.
सर्वत्र भीतीची थरकती शांतता.

मी तुझा हात धरून इथवर आलो
खुणेची झाडं आठवत.
आता पुढची खूणच दिसत नाही.

डोळ्यांमधला सूर्य मलूल
आणि माझाही चेहरा काळाठिक्कर पडत चाललेला.

## आरशासमोर

आपण आपल्या रुमालाचा चौकोन
तळव्यावर उवडतो आणि
आपला चेहरा खसखसून पुसून काढतो
दिवसभराचे तवंग निपटून काढीत.

नंतर आपण आरशासमोर
हातात फणी घेऊन
विंचरतो विस्कटले केस आणि विस्कटले सुस्कारे
जमवतो टाकठीक.
नंतर शर्टच्या वाहीशी चाळा करीत
आपण खुशाल शीळ मारतो
आणि समाधानतो की
आपल्या नागड्या देहासमोर
आरसा कसा झाकून घेतोय स्वतःला.

आपण निघून जातो
आरशाला उघडा करून सडेतोड.

## दिवसांच्या धारदार करवतीने

दिवसाचा
धगधगता मांसल चतकोर
आपण आपणासाठी कापून घ्यावा.

नंतर त्यामध्ये
चोच खुपसून
खूपसा त्रास करून घ्यावा स्वतःला.

उबत जाणारे दिवस
आणि दिवसागणिक शहारत जाणारे आपण.

आता
आपणच कापले जातोय,
खूपशा चतकोरांतून,
दिवसांच्या धारदार करवतीने.

## तिच्या चेहऱ्याच्या आठवणी

आपलाच दात वारंवार ठणकावा
तशा तिच्या चेहऱ्याच्या आठवणी येतात.
आणि तिचा चेहरा माझ्या डोळयांत, डोक्यात, मनात
एकसारखा ठणकत राहतो.

ती बोलते तिच्या चेहऱ्याइतकं सहज
आणि तिचा चेहरा इतका बोलका की
नुकत्याच उमललेल्या दर्भगर्भार अक्षरांच्या ताज्या ओळी जणू.

एकदा ती आली,
बोलली स्वतःत मोकळी झाल्यासारखी.
बोलत राहिली :
"इथे पक्षी उडताना दिसतात
हे पाहून फार बरं वाटतं.
आमच्या इथे हल्ली पक्षी उडत नाहीत.
दारासमोरची झाडंच छाटून काढलीत,
बहुतेक त्याचाच परिणाम."

नंतर एकदम टाळ्या पिटून म्हणाली :
"माणूस भरपूर आनंदात असला ना की
त्याला थोडी जखम करावी.
म्हणजे तो आपला आनंद मापू लागतो
दुसऱ्याच्या तुलनेनं."

मी काहीच बोललो नाही.
मला आठवली ती तिची कविता,
त्यातील एक ओळ :
*'पावलामागून पडावं पाऊल तशा सहज तुझ्या आठवणी'*
आणि वाटलं,
प्रत्येकाच्या मनात
त्याची स्वतःची अशी एक दुखरी जागा असते,
वारंवार उफाळून येणारी.
प्रत्येक वेळी शब्दांच्या काठीनं आपण ती
खाली खालीच ढोसत राहतो,
आणि नकळत लागावं नख ओल्या जखमेला
तसं घडत राहतं.

## क्वचितच आपण

क्वचितच आपण
आपणाला
शोधत जातो;
परत्या होत जाणाऱ्या प्रत्येक क्षणात
आपणच आपणाला
नाकारतो.

उमलणाऱ्या फुलाइतकी सहज जाणवावी अशी
सूक्ष्मतरल भावना दुसऱ्यांबद्दलची
आपण कोंडतो
छातीच्या तळघरात
आणि परकेपणाचं कुलूप घालून
अविश्वासाची किल्ली घेऊन
बसतो पहारा देत बाहेर
पुन्हा आपणच.

कधी गर्दीत घुसमटून टाकतो आपण आपले श्वास
आणि मोकळ्या वाऱ्याने
बावत जातो स्वतःहून
स्वतःशी ओळख देत नव्याने
इतकी वर्षं
जगल्यावर—

## चतकोर

आपण आपल्या हृदयाचा
चतकोर तुकडा
इतरांसाठी ठेवतो;
आणि
ते
नको असलेल्या कागदासारखा
सहज चुरगाळतात.

मग
आपण घट्ट करतो वीण मनाची
एखादी खाट
ताणून ताणून चारी बाजूंनी
घट्ट करावी
तशी.

पण
पुन्हा अंथरतात ते
त्यांची आपलेपणाची चादर त्यावर;
आणि आपल्याही नकळत कलंडतात ते
विसाव्याला.

आणि
उलगडावा चुरगाळलेला कागद अलूद
तसे आपण पुन्हा
जेमतेम पसरतो
चतकोराएवढे.

## कट

तू तुझ्यातला प्रकाश बळेबळेच अडवून ठेवावास
अशी योजना आखली जाईल;
आणि तू तुझा सायरन पुकारण्याआधीच इतरांच्या
कानांची दारं धडाधड बंद केली जातील.

तुझ्या काळजातलं गहिरं फूल
अलगद खुडून घेतील ते
आणि पाकळीवर उतरलेलं रक्त
तुझ्या बोटावर सांडेल याची खबरदारीही.

ते चिमटी चिमटी प्रकाश आपापसात वाटून घेतील
आणि मग
तुझ्या श्वासात गुदमरायला
तुला सवड दिली जाईल.

## व्यवस्थापन

प्रत्येक खोलीच्या आखीव चौकोनात
एक फूलझाड
अशी जमीन वाटून द्या.
म्हणजे फुलझाडांचे श्वास फक्त
भिंतींनाच जाणवतील.
लहेरेदार झुमकी फुलं
फक्त भिंतीतच खिदळतील
वाढतील रंगगंधांसकट.

खबरदारी एकच घ्यायची ती
फुलझाडांची मुळं
जमिनीखालून इतर चौकोनांत
पसरणार नाहीत याची,
जाळी जाळी होऊन चौकोनांवर
उलटणार नाहीत याची.

## दंश

खूपसा विखार ओतून
आपले शब्द जहरी करावेत
म्हणजे समोरच्याचा चेहरा काळा-निळा पडत जातो.

मग आपल्या संशयाचं गिरमीट
हृदयावर रोखावं,
म्हणजे ते पोखरत जातं खोलवर
आणि थपाथप गळू लागतं सगळं गरळ तुमच्याबद्दलचं.

नंतर लखलखत्या जिभेच्या सडेतोडपणे
सरळ दंश करावा वर्मावर
आणि जखमी शेपटावर वारंवार लवलवत
वेटोळावा सर्प
तसा त्याच्या मनाचा काचमणी
लालपिवळ्या थारोळ्यात तडफडताना पाहावा
आपल्या समाधानाचं पित्त शमेपर्यंत

## दूरवरून ऐकू येणारं कुत्र्याचं भुंकणं

त्या ठिकठिकाणी आकाशात विखुरलेल्या चांदण्या नव्हेत
माझ्याच मनातल्या विझलेल्या ठिणग्या फुलारताहेत धुगधुगत,
आणि ह्या निष्पर्ण झाडांच्या उभारलेल्या वेड्यावाकड्या फांद्या
जणू माझ्याच विदीर्ण मनाचे हात उगवलेले देठापासून उंच.

हा हिवाळी वारा हळूहळू वाहत आहे शहाऱ्यांना जागवीत,
एक संथ हिवाळी शीळ फुटते आहे
उललेल्या रात्रीच्या गार ओठांतून बाहेर.
शहारावे अंगभर तरी लपेटून घ्यावेत उबदार दिवस
पुन्हा पुन्हा घट्ट तसा प्रहर;
चोहोकडून फुटावा बर्फ दाणेदार
असा लखलखीत श्वास विखुरतोय हवेवर.

दूरवरून ऐकू येणारं कुत्र्याचं भुंकणं कानाजवळ
जणू जागोजाग घरातल्या दारावरून ओरडतोय आपणच;
आपणच देतोय आपल्याच मनाच्या शेपटीवर पाय
आणि ऐकतोय फिरून फिरून कानभर आक्रंदन आपलंच.

## आत्मरत घड्याळ

आत्मरत घड्याळ
जे उसासे टाकतं प्रहरांचे;
आणि ज्याचे टोल आदळतात
उभटसरळ नाकावर एकसारखे.

पायांत चप्पल सरकवून
जाताहेत मिनिटं निघून भर उन्हाची एकेक;
आणि सावली फाटत जातेय प्रत्येक टोलागणिक.

वाळूच्या माथ्यावर उभ्या असलेल्या मला
पावलांच्या मध्यावर जाणवतेय
आत आत ओढली जाणारी वाळू;
क्षणाक्षणाला उभट नाक विरवळतंय चेहऱ्यात
आणि चेहराही लागलाय वितळायला हळूहळू.

## स्वतःत स्वतःला कोंडताना

स्वतःत स्वतःला कोंडताना
अनेक दिवसांच्या रेषांमध्ये गुरफटत
आपण एकसारखे मातीशी वावरत असतो.
इतरांच्या जमिनींना नाकारून
स्वतःच्या तुकड्यावर धुळीची रांगोळी जडवीत असतो.

चिखल काय नि फूल काय
दोहोंची धगधगीत राख आपण टिळा म्हणून
लावावी भाळावर तर बोटभर खोक पडते
आणि जन्मभर भळभळती रेघ
तुऱ्यासारखी ऊर्ध्वगामी उडत राहते.

वळचणीला बसलेल्या
एकाकी हुडहुडणाऱ्या मांजरांच्या पिल्लासारखे झडलेले दिवस,
जे हाकलता येत नाहीत झटकन
आणि अपरंपार दयाही दाटून येते उगाचच
त्यांना पोटाशी कुरवाळताना.

## विहीर

अनेक कातर दिवसांची
खोल विहीर होऊ पाहतेय; आणि
मी खोल तळाशी पोहऱ्यासारखा
खाली खाली सोडला जातोय वरून आपसूक.

आत तळाशी
अपरंपार चिखल आहे मागल्या दिवसांचा
आणि किडूकमिडूक केरकचऱ्यातून
सळसळतं पाणी आटून शुष्क पडलेलं.
ढेकळांच्या थबथबत्या लाद्यांमधून
मी शोधतोय हताशपणे
आतल्या झऱ्याचा एखादा कोमेजलेला पदर
ज्याने निवेल थोडीतरी पोहऱ्याच्या ओठांची कोरड.

मी लडबडतोय त्या चिखलात
आणि वरून दोरही कापून टाकलेत कुणीतरी.

## पंप लावून

पंप लावून सगळ्यांमधलं चैतन्य काढून घेतलंय.
सगळीकडे हलतायत बाहुल्या कचकडी.
नेमस्त कवायत करावी तसे व्यवहार
आणि प्रत्येकाने आपापले श्वास सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये ठेवलेले बंदिस्त.

मी प्रत्येकाकडे कटोरा घेऊन गेलो
कुणी वाढेल चतकोर प्रेम म्हणून,
तर प्रत्येकाने दाखवलं इतरांचं दार
आणि स्वतःचे कटोरे लपवले ढुंगणाआड.

मी दिङ्मूढ होऊन परतलो स्वतःच्या दारात
तर दारात मीच उभा
ढुंगणाआड कटोरा लपवून
आणि माझंही बोट दुसऱ्याच्या दाराकडे वळलेलं तडक.

## एक प्रचंड पेटती सिगारेट

एक प्रचंड पेटती सिगारेट
आपल्या देहामनावर विझवली जातेय
आणि जागोजाग काळपट भोकं पडतायत.
आपण भोकांजवळची राख फुंकरीने उडवतो
भोक आरपार दिसावं म्हणून
आणि भरतो सांत्वनांचं मलम वरून काठोकाठ.

हे सारखं घडतंय.
तरी आतल्या आत पिळवटून
देहामनाची वात होतेय पुन्हा
आणि पुन्हा सिगारेट शिलगावली जातेयच त्यातून.

### जाळं

दिवसांचं एक प्रचंड मोठं जाळं अधांतरी
ज्यात मध्यभागी मी सूक्ष्म कीटकासारखा
एका धाग्याशी लोंबकळत
सावरीत तोल अस्तित्वाचा.
खाली पाहिलं की गरगरतं मस्तक, येते ग्लानी.
आणि वर अफाट आभाळात
असंख्य हवेचे थर दबवून टाकतात श्वाससुद्धा.
जाळ्याचा मध्यबिंदू गाठण्यासाठी तोल राखताना
आतल्या स्पंदनांनी जाळं हलत राहतं सतत,
पाय घसरतात वारंवार धाग्यावरून तरी
जुळवावे लागतात एकत्र. पुन्हा पुन्हा तीच कवायत
आणि डोंबाऱ्यासारखी हातात काठीही नाही तोल सावरायला.

## छडीही गळून पडते

आपण बसतो
डोळ्यासमोर घेऊन मागचे दिवस.
छडीच्या इशाऱ्यासरशी उभे करतो एकेक.
मास्तराने उत्तरादाखल करावीत उभी मुलं वर्गात
एकामागून एक तसे.
विचारतो—
असं काय दिलंत की ज्याने चालावा पुढचा श्वास,
किंवा श्वासाइतकी खोल ओढ लावलीत का
प्रत्येक क्षणात स्वतःत फुटताना?
दमछाक होईपर्यंत पुन्हा पुन्हा तेच.
प्रश्नांचं थकलेलं जाळं
ज्यात आपण कोळ्यासारखे मधोमध फसतो,
आपल्या नकळत.
निवांत बघतो डोळ्यामागे जातात दिवस अंधुक होत,
वर्गातून निमूट उठून जाणाऱ्या मुलांसारखे
आणि आपल्या हातातली छडीही गळून पडते आपसूक.

## बाहुली

छोटी बाहुली
छोट्यांसाठी असते;
मोठे रडतात तेव्हा त्यांना
मोठी बाहुली लागते
जिवंत.

मोठ्या बाहुलीच्या पदराने
अश्रूंची माफक गाठोडी बांधता येतात;
पदराआड राहून
पदरचं आयुष्य चवीनं खाता येतं.

मोठ्यांचे अश्रू
पटकन घरंगळत नाहीत;
अडखळत अडखळत
येऊ की नको या हिशोबाने
बाहुलीच्या कलाकलाने येतात.

जातिवंत रडणाऱ्याला
बाहुली
शोभा देत नाही.

## सूर्य आभाळाच्या चामडीवर तीक्ष्ण

सूर्य
चरत जातो आभाळाच्या चामडीवर तीक्ष्ण
आणि दिवसांचा विलक्षण पिवळट रोग
आतल्या फुप्फुसाला कुरतडत राहतो.
आजारी माणसाच्या
रावस कोमेजल्या श्वासासारखा वारा
आतून बाहेरून अस्वस्थ येरझाऱ्या घालतो.
एक मातट पायवाट
थेट माझ्या हृदयातून निघते.
दाभणासारखी सूर्याच्या डोळ्यांत कच्च घुसत जाते.

## आपण दुसऱ्याला दिलासा देतो तेव्हा

आपण
दुसऱ्याला दिलासा देतो तेव्हा
स्वतःच्या हृदयातून किती हादरलेलो असतो :
जसं पक्ष्याला देताना थारा
डहाळीने थरकापावं अंगातून लवलवत.

आपण माणसांच्या यात्रेत हिंडतो
भीतीची वस्त्रं गुंडाळून,
की प्रत्येकाचे हात झोंबतात अंगाशी फेडायला;
आणि आपण लपेटतो अंगावरची कातडी पुन्हा पुन्हा
गाउनसारखी.

चौफेर टेहेळणी सतत जारी
तरी माहीत नसतो आपल्याला
आपल्याच पायाखाली
नेमकेपणाने लावलेला सुरुंग.

## चारचौघांत क्वचित

चारचौघांत क्वचित
आपण निंदा करतो स्वतःची
जाता जाता तोंडात सुवासिक सुपारी टाकल्यासारखी;
पुन्हा ती चघळली जावी
इतरांच्या बोलण्यातून लाळेसोबत
आपलं व्यक्तित्व रंगण्यासाठी म्हणून.
एरव्ही थोपटत राहतो प्रेमाने आपण
आत्मस्तुती नावाचं कोकरू अगदी कुशीत वारंवार.

त्याची आत्ममग्न लोकर
हृदयावर हळुवार फिरणाऱ्या पिसासारखी,
आसपासच्या हवेलाही इजा न करता
पुन्हा पुन्हा अंगभर लपेटावी अशी.

सतत नालस्ती करावी असं कैकदा वागलो आहे,
तरी अनेकदा त्या गोजिरवाण्या कोकरानेच
कोंडलं आहे आपणाला
त्याच्या सुरक्षित गोठ्यात त्याच्यासमवेत
उबदार कुशीत.

## अज्ञात अक्षरांच्या खाडाखोडीत

पुन्हा पुन्हा रंगवावं असं आभाळ शोधीत
आपण आपल्या
कपाळाशीच येऊन थबकतो.

आपल्यातल्या आत्ममग्न कुंचल्यांना
श्वासाचे रंग कधी शिवले नाहीत अस्सल;
आणि जे चितारीत राहिले अखंड
आपल्या दुभंग अस्तित्वाचा विसविशीत कॅन्व्हास.

अज्ञात अक्षरांच्या खाडाखोडीत
स्वतःला रंगवून घेताना
सांडलेले कित्येक अस्पर्शी रंग
दाटून येतात आभाळभर;
घामाच्या थेंबांसारखे चमकतात कपाळावर
आणि उसासत आपण त्यांना
ललाटलेख म्हणून जाहीर करतो
स्वस्त दराने जाहीर लिलावात.

## झाड

उजाड बोडक्या मैदानात
उभ्या असलेल्या झाडाच्या
प्रत्येक पानाआत एक ठसठशीत कळ
दडलेली आहे.

वरून झाड वाऱ्यामुळं जुलुमाने हलत असलं तरी
जमिनीखाली त्याची मुळं
प्रकर्षानं सुकत सडत चालली आहेत.

आपल्या वेड्यावाकड्या फांद्यांचं
झाड एक एक कटोरा करतंय
आणि फडफडत्या पानांमधून
आभाळापाशी मूळभर ओल मागतंय.

पाण्यालाच तहान लागावी तसं आभाळ
हताश झालेल्या दात्याच्या डोळ्यांतील
नाउमेद कटाक्षांसारख्या
वरून उन्हाच्या झळा फेकतंय.

## योद्धे

शर्यतीत हरलेल्या घोड्यांप्रमाणे
योद्धे
आपल्या बराकीत
कडवट कडबा चघळीत उसासत बसलेत.

त्यांना महिन्याकाठी
रणांगणावर कुशलतेने ढालतलवार फिरविल्याबद्दल
सुक्या कडब्याच्या पेंढी
मोबदला म्हणून दिल्या जातात.
आणि त्यांच्या गोंडस आयाळीमधला
एकेक तलम केस
त्यांच्या नकळत उपटून घेतला जातो.

योद्धे फुरफुरतात क्वचित,
दौडतात क्वचित.
नियमितपणे कडबा चघळतात पुरवून पुरवून
मान खाली घालून रात्री
आपल्या तलवारींना घामाचं तेल लावून माफक
त्या घासूनपुसून लख्ख ठेवतात
पुन्हा वापरण्यासाठी.

## दैन्य

दैन्य हा एक पिसाट बुरूज :
पायथ्याशी अनेक जणांचे विव्हळते मुडदे
आणि वर टोकाशी
मेलेल्या मनांचा आधीचाच कडेलोट.

माणसं श्वास पुरवून पुरवून
आधीच सुजलेल्या फुप्फुसाला
हवेची इजा करीत जगतायत.
एक भलं मोठं अदृश्य गळू गळयाला झाल्यासारखे
सगळे वाकलेत कमरेत
आणि फिक्ट निस्तेज दिवसांचा पू झरू लागलाय त्यातून.

अहोरात्र
एकसारखी ने-आण माणसांची बुरुजाशी
की नेणाऱ्यालाही धाप लागतेय,
ओढले जाणारे तर अर्धमेले
आणि त्याहून अधिक
मुडद्याच्या कळाहीन चेहऱ्याची ताठरता बुरुजाला.

## लांबलचक पुलावरून जाताना

मराठी ग्रंथ संग्रहालय
27345
23330
काव्य
ग्रंथ शाखा
REFBK-0023330
REFBK-0023330

दहशत येते मागाहून
लांब टांगा टाकीत अंगावरून
तरातरा पुढे चालत जाते
आणि आपण चालतो घुटमळत्या पावलांनी
दावणीला बांधलेल्या कोकरासारखे
दबकत तिच्यामागे.

दिवे असतात
खालून जाताना आपली सावली
पावलांमध्ये गोठवणारे आणि पुन्हा
लांब लांब सावल्यांनी आगेमागे भेडसावणारे

भीती येते दाटून
पोटात गोळा होऊन येणाऱ्या गॅससारखी
आणि पुन्हा खोल खड्डा पडतो गप्पकन
एकेका पावलागणिक

फाटक्या अंगावर बर्फाचा खडा सांडावा नकळत
तसे शहारतो आपण,
उचकीसरशी अडकतो श्वासनळीत,
खांद्यावरल्या झोळीत हात घालतो थंडगार
किंवा चाचपतो अंग स्वतःचे पुनःपुन्हा
जेव्हा दिसते डोळ्यांना पाठीमागे
पुन्हा लांबवर दहशतीची लांबलचक सावली
नेमाने अंगावर चालून येणारी.